स.के.नं.५०६/२०२१
नि. क्र.४० सोबत

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांचा सरतपास वकील श्री.एस.बी.पाटील यांचेतर्फे सुरु.**

आता मला नि.४/१ सोबत दाखल केलेला धनादेश दाखवण्यात आला. त्यावर आरोपी क्र.२ ची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.६३** देण्यात येते. आता मला नि.४/२ सोबत दाखल केलेला चेक रिटर्न मेमो दाखवण्यात आला. सदर प्रिंट संगणकावरून काढण्यात आली असल्याने त्यावर सहीची आवश्यकता नाही असे फिर्यादी तर्फे विधीज्ञानी कथन केले. आरोपी गैरहजर. विधीज्ञ गैरहजर. त्यामुळे सदर मेमोला निशाणी देण्याच्या मुद्यावर पुढील सरतपास राखून ठेवण्यात येतो. आता मला नि.३७/१ सोबत दि.२८.०१.२०२१ रोजीचे नोटराईज करारपत्र दाखवण्यात आले. त्यावर माझ्या वडीलांची व आरोपी क्र.१ ची लिहून घेणार व देणार म्हणून सही आहे. त्यावर मी आणि सोहेल अखलाक तांबे साक्षीदार आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुनावर युसूफ हुजरे माझे वडील असून त्यांनी मला दि.१९.०३.२०२१ रोजी मुखत्यारपत्र लिहून दिले. ते नि.३७/२ कडे दाखल केले आहे. त्यावरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व वडीलाची सही आहे. त्यास **नि.६४** देण्यात येते. आता मला नि.४/५ सोबत दाखल केलेल्या दि.२१.०५.२०२१ रोजीची रजिस्टर ए.डी. नोटीसीची स्थळ प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.६५** देण्यात येते. आता मला नि.४/६ सोबत सदर नोटीस रजिस्टर पोस्टाने आरोपीस मिळाल्याची नोंद दाखवण्यात आली. त्यावर प्रधान डाकपाल यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आज रोजी नि.६२/१ सोबत डंप्पर क्र.एम.एच १२ एच डी ४८६३ च्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. दि.२२.०६.२०२१ रोजी पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांना तक्रारीची प्रत रजि. पोस्टाने पाठविल्याची पावती नि.६२/२ सोबत दाखल केली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.६६** देण्यात

येते. सदर नोटीस पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांना पोहोचल्याची पोहोच पावती नि.६२/३ सोबत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.६७** देण्यात येते.

**फिर्यादीतर्फे विधीज्ञाच्या विनंतीवरून पुढील सरतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृती.

सही/-
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१, चिपळूण

दिनांक - ११/१२/२०२५
चिपळूण.

# <u>- प्रमाणपत्र -</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | ११.१२.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ११.१२.२०२५ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | १२.१२.२०२५ |